0 7 MAY 2026

क्रांतिसिंह

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राची पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी विविध पदवी, पदव्युत्तर व प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेस सुरुवात झाली आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी दि. १० जून २०२६ पर्यंत ऑनलाइन अर्ज करावेत, अशी माहिती प्र. संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी दिली.

या प्रवेश प्रक्रियेत बी.ए., बी.कॉम. तसेच एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम.कॉम., एम.एस्सी. (गणित), एम.बी.ए. यांसारख्या दूरशिक्षण अभ्यासक्रमांचा समावेश आहे. तसेच ऑनलाईन पद्धतीने एम.बी.ए., एम.कॉम. व एम.एस्सी. (गणित) हे अभ्यासक्रम उपलब्ध असून विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रमांनाही प्रवेश दिला जाणार आहे.

डॉ. कृष्णा पाटील म्हणाले की, शिक्षणापासून वंचित राहिलेल्या, अपूर्ण शिक्षण असलेल्या तसेच शासकीय, निमशासकीय व खाजगी क्षेत्रातील कर्मचारी, उद्योजक, शेतकरी, गृहिणी, कामगार, सैनिक आदी सर्व घटकांसाठी ही एक उत्तम संधी आहे. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या राज्यभरातील ८६ अभ्यासकेंद्रांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

प्रवेशासंदर्भातील सविस्तर माहिती शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील या लिंकवर उपलब्ध आहे.

6 MAY 2026
सकाळ

# घातक वायूंचे होणार 'डिजिटल' मापन

## उपकरणाच्या डिझाइनला केंद्र सरकारचे पेटंट


कोल्हापूर, ता. ६ : वातावरणातील घातक वायू शोषून घेण्याच्या प्रक्रियेचे मानवी संपर्कविरहित डिजिटल मापन करण्यासाठी शिवाजी विद्यापीठातील संशोधकांनी 'ऑटोमेटेड गॅस अॅडसॉर्पशन मेजरमेंट डिव्हाईस' हे नावीन्यपूर्ण उपकरण डिझाईन केले आहे. त्याला केंद्र सरकारच्या पेटंट कार्यालयाने मंजुरी आणि नोंदणी प्रमाणपत्र दिले.

रसायनशास्त्र विभागातील डॉ. कल्याण गरडकर, जयसिंगपूर महाविद्यालयातील डॉ. संदीप साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली जयसिंगपूर येथील वनिता पाटील, डॉ. रोहंत ढब्बे, किशोर जाधव, कबीर कुंभार, अमृता कोळी यांनी संशोधन केले. सांगलीतील कस्तुरबाई वालचंद महाविद्यालयातील डॉ. विक्रम देसाई यांचे सहकार्य लाभले. प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी या संशोधकांचे अभिनंदन केले.

**उपकरण असे...**

हे उपकरण विशिष्ट दाब आणि तापमानाला एखादा पदार्थ किती प्रमाणात वायू शोषू शकतो, याचे विश्लेषण करते. ते पूर्णपणे स्वयंचलित असल्याने मानवी चुकांची शक्यता कमी होते.

या उपकरणात भिन्न मेटल ऑक्साइडचे गॅस सेमीकंडक्टर सेन्सर्स वापरले असून, ते अमोनिया, कार्बन डायऑक्साइड, मिथेन यांसारख्या विविध वायूंचे अस्तित्व मोजू शकते. हे उपकरण वायू प्रदूषण नियंत्रण आणि विविध औद्योगिक वायूंच्या तपासणीसाठी उपयुक्त आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी तयार केलेले ऑटोमेटेड गॅस ॲडसॉर्पशन मेजरमेंट डिव्हाइस.

0 7 MAY 2026

दैनिक माणदेशी बुलंद आवाज...
माणदेश एक्सप्रेस

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

• बुधवार दि ६ मे २०२६ •

# प्रभावी पर्यावरण संवर्धन समन्वयातूनच शक्य

## शिवाजी विद्यापीठातील गोलमेज परिषदेतील सूर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**कोल्हापूर, दि. ५ मे:** पर्यावरणाशी संबंधित कार्यरत संस्था, संघटनांनी समन्वय आणि सहकार्यातून एकत्रित काम केल्यास प्रभावी पर्यावरण संवर्धन शक्य आहे, असा सूर आज शिवाजी विद्यापीठात झालेल्या गोलमेज परिषदेत उमटला.

शिवाजी विद्यापीठाचा पर्यावरणशास्त्र विभाग, विद्यापीठ विकास मंच आणि कोल्हापूर अर्थ वॉरियर्स यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठात ही परिषद झाली.


या परिषदेस प्रमुख पाहुणे म्हणून 'दै. सकाळ'चे संपादक निखिल पंडितराव उपस्थित होते. पर्यावरण संवर्धनामध्ये जनजागृतीचे महत्त्वाचे साधन म्हणून प्रसारमाध्यमांची भूमिका अनन्यसाधारण असल्याचे सांगून ते म्हणाले, पर्यावरण संवर्धन ही आपल्या अस्तित्वाशी निगडित महत्त्वाची बाब आहे. वाढते प्रदूषण, हवामान बदल आणि नैसर्गिक संसाधनांची झपाट्याने होणारी घट ही गंभीर संकटे आपल्यासमोर उभी आहेत. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे आवश्यक आहे. प्रसारमाध्यमे या प्रश्नाकडे समाजाचे सातत्याने लक्ष वेधण्याचा प्रयत्न करतात. वृक्षारोपण, पाणीसंवर्धन आणि प्लास्टिकविरहित उपक्रम यांसारख्या कृतींमध्ये सहभागी होणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. पर्यावरण टिकले, तरच भावी पिढ्यांना सुरक्षित आणि समृद्ध जीवनाची हमी आपण देऊ शकू, अन्यथा नाही.

अध्यक्षीय भाषणात शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन या बाबींना विद्यापीठाने नेहमीच सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. यामुळेच जलसंवर्धनाच्या माध्यमातून आज शिवाजी विद्यापीठ पूर्णपणे जलस्वयंपूर्ण झाले आहे. येथून पुढेही पर्यावरणीय संरक्षणासाठी विद्यापीठ नेहमीच सकारात्मक प्रयत्न करत राहील, असेही त्यांनी सांगितले.

गोलमेज परिषदेत विविध पर्यावरणीय मुद्द्यांवर सखोल चर्चा झाली. विशेषतः पाण्याचे प्रदूषण, घनकचरा व्यवस्थापन, वृक्षतोड, प्लास्टिक संकलन, बांधकामातील खर मातीच्या व्यवस्थापनाबाबतचे प्रश्न यांसारख्या विषयांवर सहभागी संस्था प्रतिनिधींनी विचार मांडले. पर्यावरणाचे प्रश्न सोडवताना पर्यावरणविषयक कायदेशीर बाबींचा योग्य अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. विशेषत: तसेच घनकचरा व्यवस्थापन कायदा, २०२६ समजून घेऊन सध्या कचऱ्याची विल्हेवाट लावणे आवश्यक असल्याचेही सांगण्यात आले. पर्यावरणीय प्रश्नांबाबत प्रशासनाकडून माहिती मिळविण्यासाठी माहितीचा अधिकार वापरण्यासही हरकत नसल्याचे सांगण्यात आले. पर्यावरणीय समस्या सोडवण्यासाठी सर्व संस्थांनी एकत्र येऊन काम करण्याची आवश्यकता या निमित्ताने अधोरेखित झाली. विद्यापीठाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवून प्रभावी कृती आराखडा तयार करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. या परिषदेमुळे कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यावरण चळवळीला नवी दिशा मिळेल आणि विविध संस्थांमध्ये समन्वय वाढण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

परिषदेत जिल्ह्यातील वृक्षप्रेमी वेल्फेअर, निरोगी व पर्यावरणपूरक प्रतिष्ठान, निसर्ग अंकुर, गार्डन्स क्लब, वसुंधरा निसर्ग संरक्षण संस्था, सजग नागरिक मंच, कल्पवृक्ष ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट, सायकल वेडे कोल्हापूर आदी १६ स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी सहभागी झाले.

पर्यावरणशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी कार्यक्रमाची पार्श्वभूमी मांडली. कार्यक्रमास पर्यावरण शास्त्र विभागातील डॉ. सोनल चोंडे, डॉ. पल्लवी भोसले यांच्यासह संशोधक विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे कोल्हापूर अर्थ वॉरियर्सच्या तृप्ती देशपांडे यांनी आभार मानले.



वैशाख पौर्णिमेच्या चंद्रप्रकाशात उजळले शिवाजी विद्यापीठाचे रुप...

वैशाख पौर्णिमा ही सर्व पौर्णिमांमध्ये उज्ज्वल आणि शीतल मानली जाते. काल, शुक्रवारी (दि. १ मे) वैशाख पौर्णिमेच्या या तेजस्वी चंद्रप्रकाशामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीसह सर्व प्रांगण असे शुभ्रधवल होऊन गेले. या छायाचित्रणाच्या रुपाने प्रथमच रात्रीच्या प्रकाशात उजळलेल्या शिवाजी विद्यापीठाचे देखणे रुप सामोरे येत आहे.

जनसंपर्क कक्ष.
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 7 MAY 2026


पुण्यनगरी

# विद्यापीठाच्या स्वयंचलित 'गॅस ॲडसॉर्प्शन' उपकरणाला भारत सरकारचे डिझाईन पेटंट

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी तयार केलेल्या 'ऑटोमेटेड गॅस ॲडसॉर्शन मेजरमेंट डिव्हाईस' या नावीन्यपूर्ण उपकरणाच्या डिझाईनला केंद्र सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून अधिकृतरीत्या मंजुरी मिळाली असून, नुकतेच त्याचे पेटंट नोंदणी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे. विद्यापीठासह कोल्हापूरच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रासाठी ही महत्त्वाची बाब मानली जात आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ. कल्याण गरडकर आणि जयसिंगपूर महाविद्यालयातील डॉ. संदीप साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली जयसिंगपूर येथील वनिता पाटील, डॉ. रोहंत ढब्बे, किशोर जाधव, कबीर कुंभार, डॉ. अमृता कोळी यांनी हे महत्त्वपूर्ण संशोधन केले आहे. यामध्ये कस्तुरबाई वालचंद महाविद्यालयातील डॉ. विक्रम देसाई यांचेही सहकार्य लाभले. यासंदर्भात डॉ. गरडकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, वातावरणातील उष्णता शोषून 'ग्लोबल वॉर्मिंग'ला कारणीभूत असलेल्या कार्बन डायऑक्साईड वायूचे



उत्सर्जन औद्योगिकीरणामुळे प्रचंड वाढल्याने पर्यावरणाचे संतुलन बिघडले आहे. त्यामुळे ध्रुवावरील बर्फ वितळून महासागरांचे आम्लीकरण होत आहे.

आरोग्यास घातक अमोनिया वायू वातावरणातील आर्द्रतेशी अभिक्रिया पावून अल्कधर्मी द्रावण तयार करतो, ज्याच्या संपर्कामुळे मानव ऊतींना गंभीर इजा होते. त्यामुळे कार्बन डायऑक्साईड आणि अमोनियासारख्या वायूंचे दुष्परिणाम कमी करण्यासाठी त्यांचे मापन केल्यास त्यावर उपाययोजना करता येऊन वातावरणातील घातक बदल रोखता येणे शक्य आहे.

वातावरणातील घातक वायू शोषून घेण्याच्या प्रक्रियेचे मानवी संपर्कविरहित मापन करण्यासाठी सदरचे उपकरण डिझाईन केलेले आहे. हे उपकरण विशिष्ट दाब आणि तापमानाला एखादा पदार्थ किती प्रमाणात वायू शोषू शकतो, याचे विश्लेषण करते. ते पूर्णपणे स्वयंचलित असल्याने मानवी चुकांची शक्यता कमी होते आणि वायूच्या शोषणाच्या नोंदी डिजिटल पद्धतीने घेता येतात.

या उपकरणात भिन्न मेटल ऑक्साईडचे गॅस सेमीकंडक्टर सेन्सर्स वापरले असून, हे उपकरण अमोनिया, कार्बन डायऑक्साईड, मिथेन यासारख्या विविध वायूंचे अस्तित्व मोजू शकते. हे उपकरण वायू प्रदूषण नियंत्रण आणि विविध औद्योगिक वायूंच्या तपासणीसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

सध्याच्या अतिशय महागड्या यंत्रणेस पर्याय ठरणाऱ्या स्वस्त, पोर्टेबल आणि स्वयंचलित अशा 'मेटल ऑक्साईड सेमीकंडक्टर' आधारित उपकरणाची निर्मिती करण्यात संशोधकांना यश आले आहे. शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी या चमूचे अभिनंदन केले आहे.

0 7 MAY 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्वयंचलित 'गॅस अ‍ॅडसॉर्प्शन' उपकरणाला डिझाइन पेटंट

## शिवाजी विद्यापीठातील संशोधकांचे मोठे यश : वायू प्रदूषण नियंत्रण, विविध औद्योगिक वायूंच्या तपासणीसाठी ठरणार उपयुक्त

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी तयार केलेल्या 'ऑटोमेटेड गॅस अ‍ॅडसॉर्प्शन मेजरमेंट डिव्हाइस' या नाविन्यपूर्ण उपकरणाच्या डिझाइनला केंद्र सरकारच्या पेटंट कार्यालयाकडूनअधिकृतरीत्या मंजुरी मिळाली. नुकतेच त्याचे पेटंट नोंदणी प्रमाणपत्र प्रदान केले आहे. विद्यापीठासह कोल्हापूरच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रासाठीही ही महत्त्वाची बाब मानली जात आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ. कल्याण गरडकर आणि जयसिंगपूर महाविद्यालयातील डॉ.संदीप सावळे यांच्या मार्गदर्शनाखाली जयसिंगपूर येथील वनिता पाटील, डॉ. रोहंत ढव्बे, किशोर जाधव, कबीर कुंभार, डॉ.अमृता कोळी यांनी हे महत्वपूर्ण संशोधन केले आहे. यामध्ये कस्तुरबाई वालचंद महाविद्यालयातील डॉ. विक्रम देसाई यांचेही सहकार्य लाभले.



संदीप साबळे. कल्याण गरडकर वनिता पाटील अमृता कोळी रोहंत ढव्बे

या संदर्भात डॉ. गरडकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, वातावरणातील उष्णता शोषून "ग्लोबल वॉर्मिंग"ला कारणीभूत असलेल्या कार्बन डायऑक्साईड वायूचे उत्सर्जन औद्योगिकरणामुळे प्रचंड वाढल्याने पर्यावरणाचे संतुलन बिघडले आहे. त्यामुळे ध्रुवावरील बर्फ वितळून महासागरांचे आम्लीकरण होत आहे. आरोग्यास घातक अमोनिया वायू वातावरणातील आद्रतेशी अभिक्रिया पावून अल्कधर्मी द्रावण तयार करतो, ज्याच्या संपर्कामुळे मानव ऊतींना गंभीर इजा होते. त्यामुळे कार्बन डायऑक्साईड आणि अमोनियासारख्या वायूंचे दुष्परिणाम कमी करण्यासाठी त्यांचे मापन केल्यास त्यावर उपाय योजना करता येवून वातावरणातील घातक बदल रोखता येणे शक्य आहे. सध्याच्या अतिशय महागड्या यंत्रणेस पर्याय ठरणाऱ्या स्वस्त, पोर्टेबल आणि स्वयंचलित अशा' मेटल ऑक्साईड सेमीकंडक्टर'आधारित उपकरणाची निर्मिती करण्यात संशोधकांना यश आले आहे.

दरम्यान, शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी या चमूचे अभिनंदन केले आहे.

डॉ. गरडकर म्हणाले, वातावरणातील घातक वायू शोषून घेण्याच्या प्रक्रियेचे मानवी संपर्कविरहित मापन करण्यासाठी सदरचे उपकरण डिझाइन केलेले आहे. हे उपकरण विशिष्ट दाब आणि तापमानाला एखादा पदार्थ किती प्रमाणात वायू शोषू शकतो,याचे विश्लेषण करते. ते पूर्णपणे स्वयंचलित असल्याने मानवी चुकांची शक्यता कमी होते वायू प्रदूषण नियंत्रण आणि विविध औद्योगिक वायूंच्या तपासणीसाठी उपयुक्त ठरणार आहे.

0 7 MAY 2026

पुण्यनगरी



# विद्यापीठातर्फे राजर्षी शाहूंना अभिवादन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या पवित्र स्मृतींना शिवाजी विद्यापीठातर्फे अभिवादन करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी बुधवारी सकाळी राजर्षी शाहू समाधीस्थळ आणि दसरा चौक येथील राजर्षी शाहू महाराज यांचा पुतळा या दोन्ही ठिकाणी पुष्प वाहून महाराजांच्या स्मृतींना अभिवादन केले. त्याचप्रमाणे विद्यापीठाच्या राजर्षी शाहू संशोधन व विकास केंद्रामध्ये कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ. अवनीश पाटील, डॉ. देविकाराणी पाटील, डॉ. आलोक जत्राटकर, डॉ. किशोर खिलारे, अविनाश भाले, डॉ. उमाकांत हत्तीकट, सचिन घोरपडे, यश आंबोळे आदी उपस्थित होते.

07 MAY 2026

तरुण भारत


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## शिवाजी विद्यापीठातील संशोधकांची उपकरण निर्मिती; घातक वायूंचे दुष्परिणाम कमी करण्यास उपयुक्त

# स्वयंचलित 'गॅस ॲडसॉर्प्शन'ला केंद्राचे पेटंट

**शिवाजी विद्यापीठातील संशोधकांनी तयार केलेल्या ऑटोमेटेड गॅस ॲडसॉर्प्शन मेजरमेंट डिव्हाईस या नाविन्यपूर्ण उपकरणाच्या डिझाईनला केंद्र सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून अधिकृतरित्या मंजुरी मिळाली असून नुकतेच त्याला पेटंट नोंदणी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे. विद्यापीठासह कोल्हापूरच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रासाठी ही महत्त्वाची बाब मानली जात आहे.**

| त. भा. प्रतिनिधी, कोल्हापूर





डॉ. कल्याण गरडकर डॉ. संदीप साबळे

शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ. कल्याण गरडकर व जयसिंगपूर महाविद्यालयातील डॉ. संदीप साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली जयसिंगपूर येथील वनिता पाटील, डॉ. रोहंत ढब्बे, किशोर जाधव, कबीर कुंभार, डॉ. अमृता कोळी यांनी हे महत्वपूर्ण संशोधन केले आहे. यामध्ये कस्तुरबाई वालचंद महाविद्यालयातील डॉ. विक्रम देसाई यांचेही सहकार्य लाभले.

वातावरणातील उष्णता शोषून 'ग्लोबल वॉर्मिग"ला कारणीभूत असलेल्या कार्बन डायऑक्साईड वायूचे उत्सर्जन औद्योगिकरणामुळे प्रचंड वाढल्याने पर्यावरणाचे संतुलन बिघडले आहे. त्यामुळे ध्रुवावरील बर्फ वितळून महासागरांचे आम्लीकरण होत आहे. आरोग्यास घातक अमोनिया वायू वातावरणातील आर्द्रतेशी अभिक्रिया पावून अल्कधर्मी द्रावण तयार करतो, ज्याच्या संपर्कामुळे मानव ऊतींना गंभीर इजा होते. त्यामुळे घातक वायूंचे दुष्परिणाम कमी करण्यासाठी त्यांचे मापन केल्यास त्यावर उपाययोजना करता येऊन वातावरणातील घातक बदल रोखता येणे शक्य आहे, असे या संदर्भात माहिती देताना डॉ. गरडकर यांनी सांगितले. वातावरणातील घातक वायू शोषून घेण्याच्या प्रक्रियेचे मानवी संपर्कविरहितं मापन करण्यासाठी सदरचे उपकरण डिझाईन केलेले आहे. हे उपकरण विशिष्ट दाब आणि तापमानाला एखादा पदार्थ किती प्रमाणात वायू शोषू शकतो, याचे विश्लेषण करते. ते पूर्णपणे स्वयंचलित असल्याने मानवी चुकांची शक्यता कमी असते आणि वायूच्या शोषणाच्या नोंदी डिजिटल पद्धतीने घेता येतात. शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी कामगिरीबद्दल संशोधकांचे कौतुक केले आहे.

**असे काम करते उपकरण**

**या उपकरणात भिन्न मेटल ऑक्साईडचे गॅस सेमीकंडक्टर सेन्सर्स वापरले असून हे उपकरण अमोनिया, कार्बन डायऑक्साईड, मिथेन यांसारख्या विविध वायूंचे अस्तित्व मोजू शकते. हे उपकरण वायू प्रदूषण नियंत्रण आणि विविध औद्योगिक वायूंच्या तपासणीसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. सध्याच्या अतिशय महागड्या यंत्रणेस पर्याय ठरणाऱ्या स्वस्त, पोर्टेबल आणि स्वयंचलित अशा 'मेटल ऑक्साईड सेमीकंडक्टर'' आधारित उपकरणाची निर्मिती करण्यात संशोधकांना यश आले आहे.**

7 MAY 2026
सकाळ

# राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त आज त्यांच्या पवित्र स्मृतींना शिवाजी विद्यापीठातर्फे अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी सकाळी राजर्षी शाहू समाधी स्थळ आणि दसरा चौक येथील राजर्षी शाहू महाराज यांचा पुतळा या दोन्ही ठिकाणी अभिवादन केले. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू संशोधन व विकास केंद्रामध्ये कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन केले. इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ. अवनिश पाटील, देविकाराणी पाटील, आलोक जत्राटकर, किशोर खिलारे, अविनाश भाले उपस्थित होते.

07 MAY 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज




# छत्रपती शाहू महाराजांना स्मृतिदिनानिमित्त अभिवादन



**कोल्हापूर (महान्यूज अँड व्ह्यूज) :**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या पवित्र स्मृतींना शिवाजी विद्यापीठातर्फे अभिवादन करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी आज सकाळी राजर्षी शाहू समाधी स्थळ आणि दसरा चौक येथील राजर्षी शाहू महाराज यांचा पुतळा या दोन्ही ठिकाणी पुष्प वाहून महाराजांच्या स्मृतींना अभिवादन केले. त्याचप्रमाणे विद्यापीठाच्या राजर्षी शाहू संशोधन व विकास केंद्रामध्ये कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ. अवनीश पाटील, डॉ. देविकाराणी पाटील, डॉ. आलोक जत्राटकर, डॉ. किशोर खिलारे, अविनाश भाले, डॉ. उमाकांत हत्तीकट, सचिन घोरपडे, यश आंबोळे आदी उपस्थित होते.